अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १४ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

लाऊडस्पीकर,उघड्यावर मांस विक्रीवर बंदी

मुख्यमंत्री मोहन यादव यांचा शपथ घेताच मोठा निर्णय

मध्य प्रदेश : मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर मोठे निर्णय घेतले आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत मध्यप्रदेशात लाऊड स्पीकरवर बंदी घालण्यात आली आहे. तसेच व उघड्यावर मांसविक्रीवर देखील बंदी घालण्यात आली.

या आदेशासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा हवाला देण्यात आला आहे. धार्मिक स्थळे आणि इतर सार्वजनिक ठिकाणी लाऊडस्पीकरच्या अनियंत्रित वापरावर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. तसेच उघड्यावर मांसविक्रीवर बंदी घालण्याच्या सूचना दिल्या आहेत. सरकारने जारी केलेल्या आदेशाची प्रतही समोर आली आहे. त्यात लिहिले आहे की, 'विविध धार्मिक स्थळांवर निर्धारित डेसिबलचे उल्लंघन करून लाऊडस्पीकरचा वापर केला जात असल्याचे समोर आले आहे. गोंगाटाच्या वातावरणामुळे उच्च रक्तदाब, अस्वस्थता, मानसिक ताण, निद्रानाश असे परिणाम शरीरावर दिसून येतात. यामुळे कानाच्या आतील भागातही समस्या होतात. आदेशासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा हवाला देण्यात आला आहे. धलाऊडस्पीकरच्या वापरावर बंदी घालण्याचे आदेश दिले.

संसदेत हाहाकार..!

सभागृहात उड्या टाकलेल्या 'त्या' दोघांना खासदारांनीच बेदम चोपले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

भारतीय संसदेच्या नव्या भवनात बुधवारी हाहाकार माजला.दोन तरुण लोकसभेच्या दर्शक गॅलरीतून थेट सभागृहात उड्या मारल्या आणि धुराच्या नळकांड्या पेटवल्या. त्यानंतर सभागृहात पिवळ्या रंगाच्या धुराचे लोट पसरले. खासदारांमध्ये एकच खळबळ उडाली. सुरक्षा कर्मचारी आणि काही धाडसी खासदारांनी पाठलाग करून पळून जाणाऱ्या त्या दोन तरूणांना ताब्यात घेतले. काही खासदारांनी या तरूणांना बेदम चोपले देखील. कामकाज सुरू असताना हा प्रकार घडल्याने हलकल्लोळ माजला. खासदारांचे सुदैव...ही पावडर विषारी नव्हती. जर विषारी असती तर मोठा अनर्थ घडला असता. संसदेच्या इतिहासात तब्बल २२ वर्षांनी हा काळा दिवस पुन्हा उगवला. १३ डिसेंबर २००१ यादिवशी संसदेवर अतिरेक्यांनी हल्ला केला होता. त्यात ६ जण दगावले होते. सुरक्षा दलाने वेळीच ५ दहशतवाद्यांना कंठस्नान घातल्याने खासदारांवरचे मोठे संकट टळले. १३ डिसेंबरलाच या तरूणांनी हा प्रकार करण्यामागे काही राजकारण आहे की षडयंत्र आहे हे आता तपासातून निष्पन्न होईल.

संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असून लोकसभेचे कामकाज सुरू असताना सकाळी दोन अज्ञात इसमांनी प्रेक्षक गॅलरीतून सभागृहात उड्या घेतल्या. खासदारांच्या बाकांवरून उड्या मारत दोन व्यक्ती लोकसभा अध्यक्षांच्या खुर्चीच्या दिशेने धावत होते. यावेळी त्यांच्या हातात दोन कॅन होते, ज्यातून पिवळा धूर निघत होता. खासदारांनीच या दोघांना पकडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पण हा धूर जर विषारी असता तर मोठा अनर्थ घडला असता.अधिवेशन काळात संसदेला भेट देणाऱ्यांची संख्या मोठी असते. त्यामुळे नेहमीप्रमाणे गॅलरीत प्रेक्षकांची गर्दी होती. या गर्दीत तीन जण होते, त्यातील दोघांनी गॅलरीतून खाली जिथे सर्व खासदार बसून कामकाज करत असतात, तिथे उडी मारली. त्यांच्याकडे अश्रूधूर सदृश्य वस्तू होती. ज्या व्यक्तीनं गॅलरीतून उडी मारली त्यापैकी एकाचं नाव सागर असल्याचं समजतं. तो कर्नाटकातील म्हैसूरच्या खासदाराच्या ओळखीने आल्याची माहिती मिळत आहे. या व्यक्तींने आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी स्मोक कँडल पेटवले. हा धूर विषारीही असला असता किंवा स्मोक बॉम्बही असू शकला असता, अशी भीती जाणकार खासदारांनी व्यक्त केली.

खासदारांकडून यथेच्छ धुलाई

सभागृहात उड्या मारलेल्या दोघांना खासदारांनीच पकडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. घुसखोरांना खासदारांनी पकडल्यानंतर चांगलेच चोपले. सोशल मीडियावर सध्या हा व्हिडिओ व्हायरल होत आहे. सुरक्षा रक्षकांनी या घुसखोरांना ताब्यात घेईपर्यंत खासदारांनी त्यांची चांगलीच धुलाई केल्याचे स्पष्ट दिसत आहे.या प्रकरणी सुरक्षा दलाच्या कर्तव्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत.

माझ्या मुलाला फाशी द्या; वडिलांची प्रतिक्रिया

यातील मनोरंजन, हा म्हैसूरचा रहिवासी असल्याचे समोर आले आहे. आपल्या मुलाचे कृत्य समजल्यानंतर त्याच्या वडिलांनी फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

२२ वर्षांनी पुन्हा उगवला 'काळा' दिवस

उडवलेली पिवळी पावडर विषारी असती तर...

संसदेबाहेर दोघांचे आंदोलन; महाराष्ट्रातील तरुण ताब्यात

संसदेबाहेरही एक तरुण आणि एक महिला अशा दोघांनी गोंधळ घातला. रंगीत धुराच्या नळकांड्या या दोघांनी संसदेबाहेर जाळल्या. महत्त्वाची बाब म्हणजे, दोघांपैकी एक मुलगा महाराष्ट्रातील आहे. २५ वर्षांचा अमोल शिंदे हा महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील रहिवाशी आहे. तर लोकसभेबाहेर गोंधळ घालणारी ४२ वर्षीय नीलम हरियाणातील हिस्सार भागातील रहिवाशी असल्याची माहिती मिळत आहे. २००१ साली म्हणजे २२ वर्षांपूर्वी १३ डिसेंबर रोजी संसदेवर असाच भीषण दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात सहा दिल्ली पोलीस कर्मचारी, दोन संसद सुरक्षा कर्मचारी आणि एक माळी ठार झाले होते. त्यांना आज सर्व खासदारांच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली.त्यानंतर हा प्रकार घडला.

पिवळ्या रंगाचा धूर पसरला

शून्य प्रहराचे कामकाज तेव्हा चालू होते. दोन इसम प्रेक्षक गॅलरीतून उठले आणि सभागृहात असलेल्या खांबाला लटकत होते. त्यानंतर त्यांनी खाली उडी मारली. उडी मारल्यानंतर त्यांनी बाकावरून उड्या मारायला सुरुवात केली. खासदारांनी चारही बाजूंनी त्यांना घेरल्यानंतर त्यांची धांदल उडाली. त्याच्यातील एकाने पायातील बुट काढले, तोपर्यंत खासदारांनी त्याला पकडले. दुसऱ्याला इसमालाही खासदारांनीही पकडले. दरम्यान सभागृहात पिवळ्या रंगाचा धूर पसरला. कदाचित तो धूर त्या बुटातून येत होता.

नई जिंदगीतील तरुणाचा संशयास्पद मृत्यू

कुमठातांडा येथे आढळला मृतदेह

सुराज्य/सोलापूर

रात्री मित्रासोबत गेलेल्या तरुणाचा मृतदेह सकाळी बेवारस आणि संशयास्पद अवस्थेत आढळून आला. ही घटना कुमठे तांडा येथे बुधवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

वसीम उस्मान भोले (वय-२४, भीमाशंकर नगर,नई जिंदगी) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो मंगळवारी सायंकाळी घरात जेवण करून बाहेर जाऊन येतो म्हणून दुचाकी घेऊन गेला होता. रात्री त्याच्या भावाने संपर्क साधले असता मोबाईल स्वीच ऑफ असल्याचे आढळून आले. त्यानंतर उशीरा संपर्क साधल्यानंतर त्याच्या अपरिचित मित्राने 'वसिमने त्याचा मोबाईल आणि दुचाकी आपल्याकडे ठेवली.आणि अत्ता जाऊन येतो म्हणून गेल्याचे सांगितले. त्यानंतर आज बुधवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह कुमठा तांडा येथील निर्जन परिसरात आढळून आल्याची माहिती घरातील लोकांना समजली. संबधीत विजापूर नाकाच्या पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तेव्हा मयताच्या शरीरावर कसल्याही जखमा आढळल्या नाही. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून वसीमचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयाकडे पाठवून दिला. मयत वसीम भोले हा अविवाहित असून तो फर्निचरचे काम करीत होता. त्याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे मात्र अद्याप समजले नाही.पोलिसांनी त्याच्या मित्राची कसून चौकशी केली. शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे कारण समजेल. तपास पोलीस निरीक्षक शिंदे करीत आहे. तपास पोलीस निरीक्षक शिंदे करीत आहे.

उसाच्या ट्रेलरला धडक; क्रुझरमधील पाचजण गंभीर

नांदणी येथील आरटीओ चेकपोस्टजवळ अपघात

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील नांदणी येथील आरटीओ चेकपोस्टजवळ पलटी झालेल्या उसाच्या ट्रेलरला क्रुझरची धडक बसल्याने पाचजण गंभीर जखमी झाले. हा अपघात बुधवारी पहाटे घडला.

कौशल्य मंदे (वय ३०), पार्वती मंदे (वय ४०), प्रदीप गुंड (वय ३०), विजयकुमार मठपती (वय ३०), छबुराव मंदे (वय ४५) अशी जखमींची नावे असून, ते धारूर तालुक्यातील जहाँगीर मोहा येथील रहिवासी आहेत. यातील जखमी हे जमखंडीहून बीडकडे क्रुझर वाहनातून आपल्या गावाकडे निघाले होते. अपघाताच्या ठिकाणी जिंबर्गीचे विद्यमान उपसरपंच पिरसाहेब हवालदार, सुभाष नानाजे, नांदणी टोळनाका कर्मचार्यांनी तत्परता दाखवत अपघातातील जखमींना मदत केले. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. याची नोंद सिव्हिल हॉस्पिटल पोलीस चौकीत झाली आहे.

वळसंगजवळ अपघात; दुचाकीचालक ठार

सोलापूर : अक्कलकोट मार्गावरील वळसंगवाडा येथे अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकी वरील शिवाजी दगडू गायकवाड (वय-५५, रामपूर, दक्षिण सोलापूर) हे गंभीर जखमी होऊन मरण पावले.

शिवाजी गायकवाड हे खंडू मनोहर चौधरी (दहिटणे, अक्कलकोट) याच्या दुचाकी पाठीमागे बसून वळसंग ते रामपूरच्या दिशेने निघाले होते.वळसंग वाड्याजवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने दोघे जखमी झाले. त्यांना टोलनाक्याच्या कर्मचाऱ्याने शासकीय रुग्णालयात दाखल केले असता शिवाजी गायकवाड हे उपचारापूर्वी मयत झाले.मयत गायकवाड यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली असा परिवार असून ते मजुरीचे काम करत होते. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

माजी खासदार धर्मण्णा सादूल यांचे निधन

सोलापूर : काँग्रेसचे माजी खासदार धर्मण्णा मोंडय्या सादूल (वय-८३) यांचे बुधवारी निधन झाले.

मागील अनेक दिवसांपासून ते आजारी होते. काँग्रेसला सोडचिट्ठी देऊन काही महिन्यांपूर्वी त्यांनी भारत राष्ट्र समितीमध्ये सामील झाले. तब्येतीच्या कारणामुळे बीआरएसमध्ये सुद्धा ते सक्रिय नव्हते. त्यांचा जन्म १९४३ मध्ये एका गरीब हातमाग विणकर कुटुंबात झाला. तरुण वयातच ते समाज कार्याकडे आकृष्ट झाले. १९८९ साली ते पहिल्यांदा काँग्रेसकडून खासदार झाले. त्यानंतर, माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्याही काळात ते खासदार होते. नरसिंह राव यांचे ते निकटवर्तीय म्हणून ओळखले जायचे. काँग्रेसकडून ते दोनदा खासदार झाले.

सहाव्या मजल्यावरून उडी टाकून तरुणाची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

एका ३५ वर्षीय तरुणाने घराजवळच्या अपार्टमेंटमधील सहाव्या मजल्यावरून उडी टाकून आत्महत्या केली.

ही घटना एकतानगर परिसरातील राधाकृष्ण अपार्टमेंट येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. भगवतीप्रसाद ऊर्फ मोंटू सुभाष अग्नलदास (वय-३५, वज्रेश्वरनगर, पद्माकरनगर जवळ) असे मयताचे नाव आहे. बुधवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास त्याने घराजवळील राधाकृष्ण अवेन अपार्टमेंट येथील सहाव्या मजल्यावर गेला होता.त्यानंतर उडी टाकल्याने तो खाली कोसळून जागीच मयत झाला.

मयत भगवतीप्रसाद अविवाहित असून तो मिळेल ते काम करीत होता. वज्रेश्वरनगर येथे तो मावस भावाकडे राहण्यास होता. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. हवालदार पोळ पुढील तपास करीत आहेत.

गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

कुमठा नाका परिसरातील संजयनगर येथे राहणाऱ्या एका ३८ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. विशाल अर्जुन माने (वय-३८,संजयनगर, कुमठा नाका) असे मयताचे नाव आहे. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास त्याने बेडरूममधील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतला होता. याची नोंद सदर बझार पोलिसात झाली,कारण समजले नाही.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

देते है भगवान को धोका, इन्सान को क्या छोडेंगे...

कल्याण
450-96-349

मुंबई
268-66-358

विधानसभेत प्रणिती शिंदे-तानाजी सावंत यांच्यात खडाजंगी

नार्वेकरांनी सावंतांचे टोचले कान; लोकप्रतिनिधींनी पत्र दिले तरच काम करायचे नसते

सुराज्य/नागपूर

आरोग्य खात्याच्या विषयावरून बुधवारी झालेल्या विधान सभेतील चर्चेत सोलापुरातील काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे आणि आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांची जुगलबंदी रंगली.

सोलापूर जिल्हा रुग्णालयाबाबत शिंदेंनी औषधांच्या तुटवड्याचा सवाल उपस्थित केला. त्यावर आपल्याला याबाबत संबंधित लोकप्रतिनिधींनी कधीही पत्र दिले नाही असे उत्तर सावंत यांनी दिले. यावरून हाऊसमध्येच शिंदे आणि सावंत यांच्या खडाजंगी झाली. हा प्रश्न सभापतींपर्यंत गेल्यानंतर राहुल नार्वेकर यांनीही सावंत यांना सुनावले.

नार्वेकरांनी सावंत यांचे कान टोचले. लोकप्रतिनिधींनी पत्र दिले तरच काम करायचे असते असे नाही. सोलापूर रुग्णालयासाठी एक तरी पत्र दिले का? असा प्रश्न आरोग्य मंत्री यांनी आ. शिंदे यांना केला होता. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील ३१ शासकीय रक्तकेंद्रामध्ये अँलिकाँट मशीन उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी सदरचं मशीन येत्या एका महिन्यात बसवण्यात येतील, अशी घोषणा सावंत यांनी विधानसभेत केली आहे. मशीन उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी सदरचे मशीन येत्या कालावधीमध्ये आवश्यक ती खरेदीची प्रक्रिया अवलंबून खरेदी करण्यात येतील.

अशी रंगली जुगलबंदी...

प्रणिती शिंदे : आरोग्य शिबिरामध्ये लोह, मधुमेहाच्या गोळ्या जबरदस्ती दिल्या जातात. ज्यामुळे सिव्हिल रुग्णालयात गर्भवती महिलांसाठी तुटवडा होतो. सिव्हिल रुग्णालयात सीटी स्कॅनच्या मशिन्स बंद आहेत, त्यामुळे त्यांना प्रायवेटमधे जावे लागते.

सावंत : सिव्हिल रुग्णालयाचा प्रश्न वैद्यकीय शिक्षणाचा आहे. औषधांच्या तुटवड्याच्या प्रश्नासाठी मला कधी पत्रच दिले नाही तर मी कशी कारवाई करणार? मला पत्र द्या तर मी तातडीने कारवाई करेन.

अध्यक्षांनी कान टोचले

आरोग्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरावर विधानसभा अध्यक्षांनी तानाजी सावंत यांचे कान टोचले. विधानसभा अध्यक्ष म्हणाले, लोकप्रतिनिधींनी पत्र दिले तरच काम करायचं नसतं. जनतेचं प्रश्न सोडवणं सरकारच काम असते. सरकारचे नाही तर लोकप्रतिनिधीचे देखील काम आहे. जनेतची काम करणे हे लोकप्रतिनिधींचे काम आहे.

प्रणिती आरोग्यमंत्र्यावर भडकल्या

आमदार प्रणिती शिंदे म्हणाले, माझ्यावर व्यक्तिगत टीका होईल असं अपेक्षित नव्हतं या मंत्र्यांचा आदर मी करते . आम्ही जनतेचं प्रश्न विचारत आहोत. तुम्ही वैद्यकीय शिक्षण विभागाचं मंत्री नाहीत म्हणालात मग पत्र कसं लिहिणार. मी मुख्यमंत्र्यांना अनेक वेळा पत्र दिलं आणि प्रश्न लागत नाही म्हणून हा प्रश्न विचारला.